# मा. अण्णासाहेब हजारेंच्या ''सरकारचा'' सहकार

सहकाराने १०० वर्षे पुर्ण केली. भारत देशाला नवसंजीवनीची द्वारे उघडी केली, महाराष्ट्र राज्याने मात्र ह्या सहकाराला १०० टक्के आपलेसे करून घेतले. परंतु सहकाराची कहानी चित्तथरारक होत चालली आहे.

१९६० चा सहकार कायदा महाराष्ट्रासाठी, माहितीचा अधिकार कायदा - २००५ संपूर्ण भारतासाठी, साखर नियंत्रण कायदा १९६६ संपूर्ण देशासाठी. मग नेमके काय चालले आहे ? ह्याचा मागोवा ह्या अग्रलेखात आहे.

जेष्ठ समाजसेवक व माजी सौनिक मा. अण्णासाहेब हजारे ह्यांचा 'सहकाराला' विळखा अत्यंत चिवटपणे घट्ट होत आहे. आणि योग्य व्यक्तीमत्वाने, योग्य विषय, योग्य सिध्दांतावर ऐरणीवर आणला आहे. हे सरकार १० कोटी जनतेचे आहे. ग्रामपंचायत ते लोकसभा ह्या लोकशाहीच्या पवित्र मंदिरासाठी निवडून आलेले पुजक - रक्षक आहेत. सत्ताधारी व विरोधक यांचे मधील फरक दिवेसंदिवस कमी - कमी होत चालला आहे. आणि सहकाराचे हेच खरे अपयश आहे. ह्या परिस्थीतीमुळे जनता मात्र त्रस्त व उदासीन मानसिकतेने विचारत आहे की, **हे काय चालले आहे, सहकाराबद्दल?**

महाराष्ट्र राज्यातील सहकाराचे चित्र पहा. राज्यात एकूण १ लाख ८० हजार सर्व प्रकाराच्या सहकारी संस्था आहेत. त्यात २७ हजार पतसंस्था आहेत. ७०० नागरी सहकारी बँका आहेत. ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. १ राज्य सहकारी बँक आहे. १७५ सहकारी साखर कारखाने आहेत. आणि बाकी इतर सहकारी संस्था आहेत. मा. अण्णासाहेब हजारे ह्यांनी ह्या थेट आर्थिक देवाण - घेवाण करणाऱ्या सहकारी संस्थापैकी **केवळ पतसंस्थांना लक्ष्य करुन** १० कोटी जनतेच्या सरकारला कोंडीत पकडून गर्भगळीत करुन टाकले आहे. त्यामुळे पतसंस्था सोडून इतर वित्तीय संस्थांचे सरकार खूष आहे. कारण सर्व सामन्य व छोट्या कार्यकर्त्यांच्या पतसंस्थांसारख्या चळवळीस राज्य सरकार कुठल्याही प्रकारची मदत करायला तयार नाही. आणि त्यामुळे मा. अण्णासाहेब हजारे यांच्या सरकारचे काहिही बिघडले नाही. आणि हाच गैरसमज आहे असे आम्हाला वाटते.

**कर्ज बुडविणाऱ्यांना कवच** अशी भन्नाट संकल्पना मा. अण्णासाहेब हजारे यांच्या सरकारने राज्यात राबविण्याचे धोरण स्विकारलेले आहे. व इतर लोक प्रतिनिधी सुध्दा बिळात बसुन जनतेचे लक्ष दुसऱ्या विषयांकडे नेताना दिसत आहेत. आणि हेच लोकशाहीला घातक आहे. सर्वसामान्यांची ही पतसंस्थांची चळवळ पुर्णपणे भस्मसात करण्यासाठी अलिखीत कुभांड रचले आहे. परंतु **पैसा व सत्ता** ह्या पलिकडे जावून ह्या राज्यात हजारो कार्यकर्ते भविष्यकाळात आपला चमत्कार दाखवतील, ह्यात जराही शंका नाही.

नागरी पतसंस्थांकडे येणारे कर्जदार सभासद हे इतर वित्तीय संस्थांकडून नकार मिळाल्याने बहुतांशी पतसंस्थांकडे येतात. काही सभासद इतर संस्थांकडून कर्ज घेवून थकबाकी करतात. व नंतर पतसंस्थांकडे येतात. त्यापैकी काही सभासद मुळतः फसवेगिरी करतात. पतसंस्थांची चळवळ **माणसांची** आहे. शिक्षीत व अशिक्षीत प्रशिक्षण नसलेल्या लोकांमुळे प्रथमता काही संस्थांमध्ये गैरव्यवहार होतो.हे मान्य करुन प्रत्येक कर्जदार - थकबाकीदार अप्रामाणिक आहे असे माणून पतसंस्थांना दोष देण्याची भुमिका किती उचीत आहे ? याचा विचार मा. अण्णासाहेब हजारे यांच्या सरकारने करणे आवश्यक आहे.

पतसंस्थांनी कर्ज वाटले, त्यापैकी जे थकले , ते वसुल करण्यासाठी मा. अण्णासाहेब हजारे यांच्या सरकारकडे काय योजना आहे ? **कर्ज का थकले** ह्याचा शोध घेण्यासाठी सर्व सरकारी यंत्रणा मा.अण्णासाहेबांनी

कार्यरत केली. परंतू किती कर्ज बुडव्या कर्जदारांना जेलमध्ये टाकले ? मा. अण्णासाहेबांच्या सरकारकडे याचे काय उत्तर आहे ?

सरकार तात्पुरती नालस्ती टाळण्यासाठी चवताळते, हे १० कोटी जनतेला हळूहळू आता समजले आहे. कारण १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, २ ऑक्टोंबर हे मुहुर्त केवळ पतसंस्थांच्या विरोधात उपोषणासाठी सरकारने आरक्षीत करुन ठेवले आहे,असे चित्र उभे करणे म्हणजेच दुटप्पी पणाचे वागणे असून संविधनाच्या विरोधात आहे.

पतसंस्थांसाठी **एस. आर. ओ.** मागताक्षणी विनाविलंब देण्यासाठी मा. अण्णासाहेबांच्या सरकारची यंत्रणा युध्दपातळीवर का कार्यरत होत नाही ? एस. आर. ओ. **बरोबर मागताक्षणी त्वरीत पोलीस संरक्षण** देवून ठेवीदारांचे संरक्षण करण्यासाठी सरकार प्रत्यक्ष कृतीने आपला कार्यक्रम का जाहीर करीत नाही ? **अपसेट प्राईज ठरविण्याचे स्वतंत्र अधिकार** पतसंस्थांच्या एस.आर.ओ. ना थेट का दिले जात नाही ? जाहीर सभा, टी. व्ही. चॅनेल,वर्तमान पत्रे, पत्रकार परिषदामधून फक्त थापा मारायच्या व पतसंस्थांच्या **थकबाकी वसुलीसाठी कडक उपाय योजना प्रसंगी सहकार कायद्यात बदल** करुन का केली जात नाही ?या बद्दल मा. अण्णासाहेब यांच्या सरकारकडे कुठलाही कार्यक्रम नाही. हे मा. अण्णासाहेब यांनी त्वरीत मान्य करायला पाहीजे.

मा. अण्णासाहेब ! काय चाललय तुमच्या राज्यात ? शेतकऱ्यांच्या ठेवी सुध्दा वर्षानुवर्षे साखर कारखान्यांनी दिल्या नाहीत. मा. अण्णासाहेब ! ठेवी फक्त पतसंस्थांच्याच दिसतात काय ? भारताचे संविधान, शाहू-फुले-आंबेडकर, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, २ ऑक्टोबर ही सर्व शक्तीस्थळे व मुहर्त कुठे गेले ?ह्या महाभागांना जेलमध्ये आतापर्यंत का टाकले नाही ? उलट त्यांना दुसऱ्या ठिकाणी सत्तेवर बसविले. वा रे लोकशाही !आणि धन्य हो मा. अण्णासाहेबांच्या सरकारचा सहकार.

मा. अण्णासाहेब ! हिच काय लोकशाही ?हेच काय संविधान ?हाच काय शाहु-फुले- आंबेडकरांच्या विचारांचा विजय ? ह्या बँकांमधील करोडो रुपये हे सुध्दा जनतेचेच आहेत. मग साखर कारखान्यांच्या ह्या महाभागांवर मायबाप सरकार व अण्णासाहेबांनी का कारवाई केली नाही ? ''दारू पिऊन दारूबंदीचे भाषण'' करून १० कोटी जनतेला फसविण्याचा ज्यांनी विडा उचलला आहे, त्यांना अण्णासाहेबांचे निष्कलंक चारित्र्य-करारीपणा - माहितीचा अधिकार– जन आंदोलने, ही संविधानाला पायदळी तुडवून मोकाट सुटलेल्यांना संरक्षण वरीलप्रमाणे देत असेल तर हा 'मनुष्यजातीचा' अपमान आहे.

केवळ ४-५ आमदार - मंत्र्यांना सत्तेतून घालवून हिरे-मोतीच्या खाणींवर दरोडा टाकणारे सहिसलामत ठेवून ''पतसंस्थांना'' टार्गेट करणे अण्णासाहेब व त्यांच्या सरकारला भविष्यकाळात पेलवणार नाही.

पतसंस्थांना मागताक्षणी **विनाविलंब एस. आर. ओ.** द्या. मागताक्षणी **विनाविलंब पोलिस संरक्षण** द्या. **एस.आर.ओ.ना अपसेट प्राईज ठरविण्याचे स्वतंत्र थेट अधिकार** द्या. कलम **१०१ खाली निवाड्यांचे निकाल तीन महिन्याच्या आत** देवून त्या निवाड्यांवर **बेकायदेशीर स्थगीती देण्याचे पापी काम थांबवा**. मा. अण्णासाहेब ! काय होते ते पहा. पतसंस्थांमधील ठेवीदारांची चिंता पतसंस्था चालकांना चांगली माहिती आहे. परंतू महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या **१५ हजार कोटींच्यावर ठेवी वर्षानुवर्षे परत न करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांच्या विरोधात व शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्यांच्या विरोधात** २ ऑक्टोबर २००८ पासून आंदोलन सुरू करा आणि संविधनाला,शाहु-फुले-आंबेडकरांना वंदन करा असे विनम्रपणे आवाहन जेष्ठ समाजसेवक, माजी सैनिक मा. अण्णासाहेब हजारे यांना राज्यातील २७ हजार पतसंस्थांच्या वतीने करीत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार!!!**